# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. महासभा दि.18/04/2018

प्रकरण क्रमांक ( 04 ) :- मा. महासभा दि.08/12/2017 ठराव क्र.44 बाबत फेर विचार करणे.

**ठराव क्रमांक. (     ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना शासनाने 1997 मध्ये मंजूर केलेली असून सदर मंजूर योजनेतील आरक्षणाच्या बऱ्याचशा जागा मालकांनी अजून पर्यंत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या नाहीत. सदर आरक्षणाच्या जागांच्या जागा मालक लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम तसेच वाणिज्य वापर करीत असून भाड्याने देखिल दिल्या आहेत. त्यामुळे आरक्षणाच्या जागा ताब्यात देण्यात येत नाहीत. सदर जागेवरील कार्यक्रमांसाठी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात येत नसल्याने कार्यक्रमा दरम्यान सदर ठिकाणी कचरा व घाण निर्माण होऊन दुर्गंधी पसरते व परीसर अस्वच्छ होतो. तसेच कार्यक्रमा दरम्यान मोठी गर्दी होत असल्याने वाहतूकीस व रहदारीस अडथळा निर्माण होऊन पोलिस व वाहतूक विभागास देखिल कार्यक्रमांची माहिती नसल्याने काही अपघात अथवा दुर्घटना घडल्यास गंभीर परीस्थिती निर्माण होऊ शकते.

वरील विषयाचा प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याचे अवलोकन करता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

1) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षणाच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे हटविणे व जागा ताब्यात घेणे, भूसंपादनीची कार्यवाही व विहीत प्रक्रीया त्वरीत सुरू करावी.

2) आरक्षणाच्या जागेचा नियमितपणे वाणिज्य वापर होत असल्यास सदर जागेवर कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यांत येऊ नये. अतिक्रमण विभागाने त्यावर नियमानुसार कारवाई करण्यांत यावी. तथापि अशा जागेचा बेकायदेशीर वाणिज्य वापर होत असल्यास 0 ते 2000 चौ.फुटा पर्यंतच्या जागेसाठी रु.22.50 पै चौरस फुट दराने व तदनंतर त्यापुढील जागेसाठी प्रती चौरस फुटास रु.1.50 पै दर प्रति माह दंड आकारण्यांत यावा त्यानुसार वार्षिक दंडाची रक्कम कायम करुन वसुली करण्यांत यावी.

3) ज्या मोकळ्या जागेचा वापर आरक्षण व्यतिरिक्त मार्बल, नर्सरी, गॅरेज व अन्य व्यावसायिक कामासाठी होत असेल अशा जागेसाठी 0 ते 2000 चौ. फुटापर्यंत मा. महासभा दि.20/02/2018 ठराव क्र.60 नूसार रु.7.50/- प्रति चौ. फुट दराने कर आकारणी करावी. व तदनंतर त्यापुढील जागेसाठी मा. महासभा दि.08/12/2017 ठराव क्र.43 नूसार रु.0.50 चौ. फुट दराने कर आकारणी

करण्यात यावी. ज्या जागेवर नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे अशा मोकळ्या जागांवर कर आकारणी करण्यात येवू नये.

4) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण किंवा इतर मोकळ्या जागेचा वापर लग्न कार्य, व्यवसायिक वापर खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्रम मर्यादीत कालावधी करीता होत असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक राहील. सदर कार्यक्रमासाठी प्रति दिन रु.10,000/- या प्रमाणे परवानगी शुल्क घेण्यात यावे. वरील दर एका दिवसासाठी एका कार्यक्रमासाठी राहतील व सदर कार्यक्रमासाठी एका दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी हवी असल्यास पुढील प्रत्येक दिवसासाठी रु.2500/- प्रती दिन प्रमाणे शुल्क वसुल करण्यांत यावे. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रति दिन रु.30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसूल करण्यात यावे. सदर कार्यवाही प्रभाग अधिकारी यांनी करावी.

5) सदर मोकळ्या जागेवर अनधिकृत शेड अथवा इतर बांधकामे असल्यास शास्तीसह महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने कर आकारणी करण्यात यावी.

6) सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व-खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.

7) आरक्षित जागेवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.

8) ज्या मोकळ्या जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची परवाना शल्क रक्कम न भरल्यास त्यांची माहिती सर्व्हे क्रमांकासह नगररचना विभागास देण्यात यावी. तसेच आरखणाच्या जागेवर देखिल आकारण्यात आलेल्या दंडात्मक शुल्काचा भरणा जमिन मालकाने न केल्यास सदर जमिन मालकाची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. नगररचना विभागास अशा मालमत्ताने सर्व्हे क्रमांक कळविण्यात यावे. नगररचना विभागाने अशा सर्व्हे क्रमांकावर परवानगी देण्यापुर्वी सर्व रक्कम कर विभागाच्या प्रचलित नियमानुसार व्याजासह वसुल करावी.

9) नगररचना विभागाने मोकळया व आरक्षित जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्रमाणे शुल्क, दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.

10) एखाद्या जागेचा वापर क्रिडा, खेळासाठी होत असल्यास कोणतेही शुल्क, कर आकारणी करण्यांत येऊ नये तसेच मैदानांचा व्यवसायिक वापर, कोचिंग किंवा सरावासाठी नियमितपणे शुल्क आकारुन वापर होत असल्यास वरील धोरणानुसार रक्कम वसुल करावी.

वरील धोरणांची अमंलबजावणी 01 एप्रिल 2018 पासुन करण्यांत यावी.

सुचक :- (सही) श्री० प्रशांत दळवी

अनुमोदन :- (सही) Dipika Arora

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**

PC-3/DK/2018-19/MT -4